


दैनिक **अचूक वेध, अचूक बातमी**

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध    Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १७८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०९ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# एसटी बस प्रवाशांसाठी मोठी बातमी! सेवा विस्कळीत होण्याची शक्यता !!

## कर्मचाऱ्यांकडून सरकारला ३ दिवसांचा 'अल्टिमेटम'

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, नागपूर :** राज्यभरातील एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य सरकारकडून आलेल्या रकमेबरोबर वाढीव वेतनाचा फरक देण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, संबंधित रक्कम न दिल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

येत्या १० तारखेपर्यंत वाढीव वेतनाचा फरक न दिल्यास रितसर नोटीस देऊन तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही श्रीरंग बरगे यांनी दिला आहे. एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनासाठी साधारण ४७५ कोटी रुपये खर्च येतो. त्यासोबतच वाढीव वेतनवाढीचा फरक देण्यासाठी दरमहा सुमारे ५८ कोटी ३० लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद आवश्यक आहे. सन २०२० ते २०२४ या कालावधीतील वेतनवाढीच्या फरकासाठी राज्य सरकार दरमहा सुमारे ६५ कोटी रुपये देईल, अशी घोषणा १३ ऑक्टोबर २०२५ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत झालेल्या सर्व श्रमिक संघटनांच्या बैठकीत करण्यात आली होती. मात्र, गेल्या दोन महिन्यांपासून ही रक्कम राज्य सरकारकडून एसटी महामंडळाला मिळालेली नाही. त्यामुळे राज्य सरकारची अब्रू वाचवण्यासाठी महामंडळाने स्वतः च्या तिजोरीतून दोन महिन्यांचा वाढीव वेतनफरक कर्मचाऱ्यांना अदा केला. या महिन्यात तीन महिन्यांची एकत्रित ११६.६९ कोटी रुपयांची रक्कम देण्यात यावी, असे पत्र महामंडळाने २० जानेवारी २०२६ रोजी राज्य सरकारकडे पाठवले होते. तरीही ही रक्कम न आल्याने व्यवस्थापनाने वाढीव वेतनाचा फरक कर्मचाऱ्यांना देऊ नये, असा निर्णय घेतला असून आज कर्मचाऱ्यांना फरकाविना वेतन देण्यात आले.

एकीकडे महामंडळावर सुमारे ४२०० कोटी रुपयांची वैधानिक देणी थकीत असताना, दुसरीकडे कर्मचाऱ्यांना वाढीव वेतनाचा हप्ता न देणे ही सरळ अवहेलना असल्याचे बरगे यांनी स्पष्ट केले. येत्या तीन दिवसांत वाढीव वेतनफरकाची रक्कम न मिळाल्यास रीतसर नोटीस देऊन एसटी कर्मचारी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडतील, असा ठाम इशाराही त्यांनी दिला आहे.



# शिळफाटा परिसरात दुर्दैवी घटना !

## ६ वर्षाच्या मुलीचा पाण्यात बुडून मृत्यू

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०८, शिळफाटा (ठाणे) :** दिवा येथील शिळफाटा परिसरातील बांधकामाच्या ठिकाणी दि.०६ फेब्रुवारी २०२६ सायंकाळी खेळत असलेल्या सहा वर्षांच्या कशफ नबीला खान(६) या मुलीचा पाण्याने भरलेल्या डबक्यात पडून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी समोर आली आहे. तिच्या कुटुंबीयांनी शोध घेतला असता ती सापडली नसल्याने त्यांनी डायघर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.त्यानंतर शिळ अग्निशमन केंद्राचे अधिकारी, डायघर पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आणि पाण्याने भरलेल्या डबक्यातून तिचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. शवविच्छेदन आणि पुढील तपासासाठी मृतदेह कळव्यातील



श्री छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी अपघाती मृत्यूचा गुन्हा नोंदवून तपास सुरु केला आहे.

# औद्योगिक क्षेत्रात गुंडगिरी करणाऱ्यास ठोकून काढा - मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : राजकूमार इकडे**

**दि.०८, सुपा (अहिल्यानगर) :** औद्योगिक क्षेत्रात झुंडशाही व गुंडशाही खपवून घेतली जाणार नाही. सुपा औद्योगिक क्षेत्राची वेगाने वाढ होत असताना काही घटक उद्योजकांना त्रास देण्याचे प्रकार करत असल्याची माहिती मिळाली आहे. हे अजिबात सहन केले जाणार नाही. अशा घटकांना ठोकून काढले जाईल, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

मात्र, ठोकून काढणे म्हणजे कायद्याच्या चौकटीतच कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. अहिल्यानगर-पुणे महामार्गावरील सुपा (ता.पारनेर) औद्योगिक क्षेत्रातील तौरल इंडिया या प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते रविवारी (दि.०८) झाले. यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, आ.काशिनाथ दाते, आ. विक्रम पाचपुते, महंत नामदेव शास्त्री, महंत शिवाजी महाराज, तौरल इंडियाचे प्रमुख भरत गिते उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नागरिकांना उद्योगांकडून काही अडचणी असतील तर त्यांनी अधिकृत यंत्रणेकडे तक्रार करावी. मात्र, उद्योगांना दिला जाणारा बेकायदेशीर




त्रास खपवून घेतला जाणार नाही. सुपा औद्योगिक क्षेत्रात नवीन उद्योग येत असताना येथे काही वाईट 'उद्योग' ही निर्माण होत असल्याची माहिती आहे. अशा घटनांकडे कायदा- सुव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत गांभीर्याने पाहिले जाईल. जिल्हा पोलीस अधीक्षकांना याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

'इज ऑफ डुइंग बिझनेस' उत्पादन खर्चातील सुलभता आण मिजबूत कायदा- सुव्यवस्थेमुळे महाराष्ट्रात उद्योगवाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर औद्योगिक क्षेत्रातील अगदी लहान घटनाही गंभीर मानून त्यावर तातडीने कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्रात उद्योगवाढ होत असताना पर्यावरणाच ` संरक्षणही तितकेच महत्त्वाचे आहे. उद्योग पर्यावरणपूरक असले पाहिजेत. उद्योगवाढ आण पिर्यावरण यांचा समतोल साधणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. यापूर्वी उद्योगवाढ प्रामुख्याने मुंबई-पुणे पट्ट्यात मर्यादित होती.

आता उद्योगांचे विकेंद्रीकरण सुरू करण्यात आले असून राज्याच्या प्रत्येक भागात उद्योग पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. मेक इन इंडियाच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करण्याचा सरकारचा प्रयत्न असून उत्पादन क्षेत्र अर्थव्यवस्थेचा कणा ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, दावोस गुंतवणूक परिषदेनंतर सरकार काय करते? याचे उत्तर सुपा औद्योगिक क्षेत्रातील तौरल इंडिया या एका वर्षातच उत्पादन सुरू झालेल्या प्रकल्पाने दिले आहे. विशेष म्हणजे हा प्रकल्प एका मराठी उद्योजकाने उभारला आहे. तौरल इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते यांनी प्रकल्पाची माहिती देताना ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली असून १,२०० जणांना थेट रोजगार उपलब्ध झाल्याच` सांगितले.

# आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या तत्परतेमुळे रोहनकर कुटुंबाला तातडीची १० लक्ष रुपयांची मदत



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या संवेदनशील वृत्तीची पुन्हा एकदा प्रचिती आली. मातृछत्र गमावलेल्या एका कुटुंबाला त्यांच्या तत्परतेमुळे तातडीने आर्थिक मदत मिळाली. या कृतीमुळे त्यांच्यातील एक आदर्श लोकप्रतिनिधी सर्वसामान्यांना पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला. गोंडपिपरी येथील वास्तु कार्यक्रमावरून परत येत असताना बामणीजवळ (बल्लारपूर) झालेल्या दुर्दैवी ट्रक अपघातात चंद्रपूरच्या छोटा बाजार येथील रहिवासी श्रीमती नीलिमा देवराव रोहनकर यांचे निधन झाले. या दुःखद घटनेनंतर आ. सुधीर मुनगंटीवार यांनी तात्काळ पुढाकार घेत रोहनकर कुटुंबाला आर्थिक आधार मिळवून दिला. प्रभाग क्रमांक ७ जटपुरा येथील नगरसेवक रवी वामनराव लोणकर यांनी या घटनेची माहिती आ. सुधीर मुनगंटीवार यांना दिली. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दखल घेत लॉयड्स मेटल्सचे सिनियर जनरल मॅनेजर यांना अमित जयसिंग यांना या घटनेसंदर्भात माहिती देत लॉयड्स मेटल्स कंपनीकडून तात्काळ आर्थिक मदत देण्याचे निर्देश दिले.

चंद्रपूर येथील शासकीय विश्रामगृहात मृतक महिलेचे पती देवराव रोहनकर, मुलगी निरुपा व नातेवाईकांची भेट घेऊन आ. सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांना धीर दिला. त्यांच्या पुढाकारातून लॉयड्स मेटल्सकडून तातडीने १० लाख रुपयांचा धनादेश मंजूर करून तो सुपूर्द करण्यात आला. हा आर्थिक आधार त्यांच्या दुःखाची भरपाई करू शकत नाही; मात्र या कठीण प्रसंगी आपण त्यांच्या सोबत आहोत, ही भावना व्यक्त करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे, असे आ. मुनगंटीवार यांनी नमूद केले. रोहनकर कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती लाभो आणि दिवंगत आत्म्यास सद्गती मिळो, हीच प्रार्थना आ.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

# 'इसे बोलते है ट्रिगर...'; डायलॉग मारला अन् गोळी सुटली

## आरोपी पोलीसी खाक्यासमोर पोपटासारखा बोलला...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, छ.संभाजीनगर :** इसे बोलते है मॅगझिन, और इसे बोलते है ट्रिगर... तान दिया, ट्रिगर दबाया और खेल खल्लास! वास्तव चित्रपटातला हा डायलॉग वाळूजमध्ये एका मित्राने प्रत्यक्ष अमलात आणला. दोन मित्रांमध्ये सुरू असलेल्या पिस्तूल बाजीच्या नादात एकाच्या हातून गोळी सुटली आणि त्याचाच जिवलग मित्र गंभीर जखमी झाला. सुरुवातीला अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केल्याचा बनाव करणाऱ्या या मित्रांचे बिंग अखेर वाळूज पोलिसांनी फोडले आहे.

**नेमकं त्या रात्री घडलं काय?**

शनिवारी रात्री वाळूजमधील शिवराई फाटा परिसरात सन्नाटा असताना, अझहर सय्यद आणि महेश पवार हे दोन मित्र गप्पा मारत बसले होते. अझहरच्या हातात एक गावठी कट्टा होता. पिस्तूलसोबत खेळताना किंवा हवा करण्याच्या नादात



अझहरकडून अचानक ट्रिगर दाबला गेला. एक भयानक आवाज झाला आणि क्षणार्धात गोळी महेशच्या मांडीत आरपार घुसली. मित्र रक्ताच्या थारोळ्यात पडलेला पाहून अझहरने त्याला घाटी रुग्णालयात नेले. पण तिथं त्याने एक फिल्मी कहाणी रचली. आम्ही बाईकवर जात असताना टोलनाक्याजवळ कुणीतरी गोळी झाडली, असा बनाव त्याने डॉक्टरांना सांगितला. मात्र, पोलिसांच्या नजरेतून अझहरचा घाम आणि उडवाउडवीची उत्तरं सुटली नाहीत.

**वाळूज पोलिसांचा खाक्या अन् बिंग फुटलं...**

वाळूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवचरण पांढरे आणि उपनिरीक्षक अजय शितोळे यांनी अझहरला ताब्यात घेऊन उलटतपासणी सुरू केली. पोलिसांच्या एकाच प्रश्नावर अझहरची बोलती बंद झाली आणि त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

पोलिसांनी त्याच्या पडेगाव येथील घरातून गावठी पिस्तूल आणि ३ जिवंत काडतुसे जप्त केली आहेत.ही कारवाई पोलीस निरीक्षक शिवाचरण पांढरे पो उप नि अजय शितोळे पो अ विजय पिंपळे, सुधाकर पाटील, नितिन धुळे, गफ्फार शेख व पोलीस मित्र किशोर गाडेकर, अमन शेख यांनी केली.


**शस्त्रांचं रॅकेट सक्रिय असण्याचा संशय...**

मौजमजेसाठी तरुणांच्या हातात ही जीवघेणी शस्त्रे येतात कुठून? यामागे एखादं मोठं रॅकेट तर नाही ना? या दिशेने आता पोलीस तपास करत आहेत. या घटनेमुळे वाळूज परिसरात मोठी खळबळ उडाली असून मस्ती कधी जीवावर बेतेल, सांगता येत नाही याचीच चर्चा रंगली आहे.

# क्षेत्र कुठलेही असो, तुमचा प्रभाव पडू लागला की बदनामी अटळ आहे !



- प्रविण बागडे
नागपूर
मो.९९२३६२०९१९




समाजात एखादी व्यक्ती, संस्था किंवा विचारधारा शांतपणे, न बोलता आपले काम करत असते तो पर्यंत ती फारशी कुणाच्या नजरेत येत नाही. पण ज्या क्षणी त्या कामाचा परिणाम दिसू लागतो, लोकांच्या जीवनात बदल घडू लागतो, प्रश्न विचारले जाऊ लागतात, तेव्हा त्या प्रभावाची पहिली किंमत द्यावी लागते बदनामीच्या स्वरूपात. कारण प्रभाव हा केवळ प्रगतीचा सूचक नसतो; तो विद्यम ान सत्ताकेंद्रांना, सोयीस्कर व्यवस्थेला आणि जडलेल्या हितसंबंधांना दिलेला थेट आव्हान असतो. इतिहास साक्षी आहे, प्रभावी माणसाची बदनामी ही अपघात नसून नियोजनबद्ध प्रक्रिया असते, कारण प्रभाव म्हणजे अस्वस्थ करणारी जाणीव. प्रभावी व्यक्ती किंवा विचार समाजाला अस्वस्थ करतो. तो लोकांना प्रश्न विचारायला शिकवतो, स्वीकारलेली गुलामी नाकारायला भाग पाडतो, आणि हे असेच का? असा म ूलभूत प्रश्न उभा करतो. ही अस्वस्थता अनेकांना नकोशी असते. कारण प्रश्न विचारणारा समाज म्हणजे हुकूमशाही, अन्याय आणि शोषणासाठी धोक्याची घंटा. म्हणूनच ज्या क्षणी तुमचा प्रभाव वाढू लागतो, त्या क्षणी तुमच्याविरोधात संशय निर्माण केला जातो, तुमच्या हेतूंवर प्रश्नचिन्ह उभे केले जाते, आणि हळूहळू तुमची प्रतिमा मलिन करण्याचे उद्योग सुरू होतात.

आजच्या काळात बदनामी ही तलवारीसारखी समोरून चाल करून येत नाही; ती विषासारखी हळूहळू शरीरात भिनते. कुजबुज, अफवा, अर्धसत्य, अतिशयोक्ती, जुने संदर्भ तोडून मांडणे ही बदनामीची आधुनिक हत्यारे आहेत. सोशल मीडियाच्या युगात तर बदनाम ीला वेग आणि व्याप्ती दोन्ही मिळाले आहेत. एका क्लिकवर तुमच्यावर आरोप, एका पोस्टवर तुमचा चारित्र्यहनन, आणि एका व्हिडिओत तुम च्या संपूर्ण कार्याचा अपलाप. सत्य तपासण्याची तसदी न घेता लोक निर्णय देतात. कारण सत्य शोधणे मेहनतीचे काम आहे, तर बदनामी स्वीकारणे सोपे. नेमकी प्रभावी माणसेच लक्ष्य कां होतात? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. समाजात अनेक चुकीच्या गोष्टी घडत असतात, अनेक भ्रष्ट, अपयशी, अनैतिक लोक वावरत असतात, पण त्यांच्यावर फारशी टीका होत नाही. मग बोट का रोखले जाते ते नेहमी काम करणाऱ्यांवरच? कारण निष्क्रिय माणूस कुणाचाच शत्रू नसतो. तो व्यवस्थेला धोका नसतो. पण प्रभावी व्यक्ती ही व्यवस्थेच्या कमतरतांचा आरसा दाखवते. ती सांगते हे शक्य आहे, बदल होऊ शकतो. आणि ही शक्यता अनेकांच्या स्वार्थाला घातक ठरते. म्हणूनच बदनामीचा हेतू एकच असतो, विश्वास तोडणे. लोकांचा विश्वास ढळला, की प्रभाव आपोआप कमी होतो. काम कितीही चांगले असले, तरी संशयाची सावली पडली की समाज मागे सरकतो. इतिहासातील प्रत्येक परिवर्तनाची हीच कथा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असोत, महात्मा गांधी असोत, म हात्मा फुले असोत किंवा आधुनिक काळातील कोणताही समाज परिवर्तनवादी, प्रत्येकाच्या वाट्याला बदनामी आलीच. कुणाला देशद्रोही ठरवले गेले, कुणाला धर्मविरोधी, कुणाला सम ाजविघातक, तर कुणाला सत्तालोलुप.

परंतु इतिहासाने एक गोष्ट स्पष्ट केली, बदनामी क्षणिक असते, प्रभाव टिकून राहतो. कारण बदनामी शब्दांवर उभी असते, तर प्रभाव कृतींवर. बदनामी ही अपयशाची कबुली असते. जेव्हा तुमच्या विचारांना तर्काने, तुम च्या कामाला पर्यायाने, आणि तुमच्या प्रश्नांना उत्तराने पराभूत करता येत नाही, तेव्हा शेवटचा उपाय म्हणजे व्यक्तीवर हल्ला. हा हल्ला म्हणजेच बदनामी. म्हणजेच बदनामी ही प्रत्यक्षात तुमच्या अपयशाची नाही, तर तुमच्या विरोधकांच्या अपयशाची कबुली असते. त्यांना तुमच्याशी वैचारिक लढाई जिंकता आली नाही, म्हणून त्यांनी चारित्र्यहननाचा मार्ग स्वीकारला. इथेच प्रभावी माणसाची कसोटी लागते. बदनामीला घाबरून तो माघार घेतो का? की सत्याच्या मार्गावर ठाम राहतो? अनेकजण इथेच थकतात. कारण बदनामी वेदनादायी असते. ती केवळ प्रतिमेवर नाही, तर मनावर, नात्यांवर आणि आत्मविश्वासावर आघात करते. पण जो माणूस स्वतःच्या हेतूंवर प्रामाणिक असतो, त्याला एक गोष्ट माहीत असते आज नाही, उद्या नाही, पण एक दिवस सत्य उघड होणारच. फक्त प्रभावी व्यक्तींनीच नाही, तर समाजानेही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आपण अफवांवर विश्वास ठेवतो का? अर्धसत्य स्वीकारतो का? की प्रश्न विचारतो? कारण बदनामी फोफावते ती प्रेक्षकांच्या मौनामुळे. जर समाज सजग झाला, विवेक वापरू लागला, तर बदनामीचे उद्योग आपोआप निष्प्रभ ठरतील. अन्यथा प्रत्येक नव्या विचाराचा गळा दाबला जाईल आणि सम ाज स्थैर्याच्या नावाखाली कुजत राहील.

म्हणूनच एक गोष्ट स्पष्टपणे सांगावी लागेल की, क्षेत्र कुठलेही असो, तुमचा प्रभाव पडू लागला की बदनामी अटळ आहे. ती भीतीदायक वाटू शकते, त्रासदायक असू शकते, पण ती तुमच्या अपयशाची खूण नाही; ती तुमच्या यशाची चाहूल आहे. इतिहास कधीही बदनामी करणाऱ्यांच्या नावाने ओळखला जात नाही; तो नेहमी प्रभाव टाकणाऱ्यांच्या नावाने लिहिला जातो. म्हणूनच बदनामीच्या गदारोळातही जेव्हा तुम्ही शांतपणे, ठामपणे आणि प्रामाणिकपणे काम करत राहता, तेव्हाच खरा परिवर्तनाचा अध्याय सुरू होतो. कारण शेवटी एकच सत्य उरते, बदनामीची वादळे थांबतात, पण प्रभावाची दिशा इतिहास ठरवतो.

# चीनचा निर्यातझपाटा



सन २०२५ मध्ये चीनने तब्बल १.२ लाख कोटी डॉलरचा विक्रमी व्यापार अधिशेष (ट्रेड सरप्लस) नोंदवला आहे. कोणताही गवगवा किंवा मोठ्या घोषणा न करता चीनने अत्यंत सहजतेने ही कामगिरी पार पाडली आहे. सामान्य भाषेत सांगायचे तर त्यांनी जितक्या मालाची आयात केली त्यापेक्षा किती तरी पटीने जास्त त्यांनी निर्यात केली, ज्याच्यामुळे त्यांच्या पदरात हा प्रचंड महसूल पडला आणि व्यापार अधिशेष या विक्रमी आकड्यावर पोचला.

गेल्या काही वर्षांपासून, मुख्यत्वे करोना काळापासून; जागतिक मागणीतील मंदी, भू-राजकीय तणाव, शुल्क, आणि 'डी-कपलिंग' (आंतरदेशीय आर्थिक किंवा व्यापारी परस्परावलंबन कमी करणे) यामुळे चीनच्या निर्यातक्षमतेला खीळ बसेल, अशी चर्चा जगभर सुरू होती. चीनने मात्र याकडे अजिबात लक्ष न देता आपले काम चालू ठेवले. अमेरिकेने चीनवर शुल्क लागू केले. पण 'बॅन चायनीज प्रॉडक्ट्स' अशा मथळ्याचे टी-शर्ट आणि टोप्या चीननेच बनवून त्या अमेरिकेला दुसऱ्या देशांमार्फत विकल्या! अमेरिकेच्या नव्या शुल्कांमुळे चीनने आपला मोर्चा आग्नेय आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि आखाती देशांकडे वळवला. कोणत्याही गोष्टीसाठी – मग ती निर्यात असो वा आयात – अमेरिकेसारख्या देशावर अवलंबून न राहण्याचे चीनचे धोरण अनेक वर्षांपासून सुरू आहे, आणि या 'टेरिफ वॉर'च्या काळात त्यांनी त्याला अधिक चालना दिली.

या वाढलेल्या अधिशेषामागे निर्यात आणि आयात यांच्यातील वाढती तफावत हा मोठा घटक आहे. अगदी इलेक्ट्रिक वाहनांपासून ते सोलर पॅनेल्सपर्यंत आणि खेळण्यांपासून ते औषधांपर्यंत, चीन प्रत्येक गोष्ट निर्यात करतो. त्यांची आयात मात्र तुलनेने संथ गतीने वाढते आहे. त्याचे एक कारण म्हणजे, चीन स्वतःला जास्तीत जास्त स्वावलंबी करू पाहतोय. 'मेक इन चायना'चा अर्थ भारतासारखा 'असेम्ब्ल इन इंडिया' नसून खरोखरच प्रत्येक गोष्टीचे उत्पादन चीनमध्ये होते आहे. चीनची देशांतर्गत मागणी मात्र कमकुवत होत चालली आहे आणि चिनी ग्राहक हात आखडून खर्च करताना दिसतोय, हे ती दरी वाढण्याचे दुसरे प्रमुख कारण.

विशेष म्हणजे, हा वाढलेला अधिशेष कोणत्याही मुद्दाम राबवलेल्या धोरणाचा भाग नाही. 'चीन व्यापार अधिशेषाचा पाठपुरावा करत नाही, तो आपोआप घडतो,' असे चिनी सरकार सांगते. तांत्रिकदृष्ट्या हे खरे असू शकते; परंतु जेव्हा धोरणे मोठ्या प्रमाणावरील उत्पादन, लॉजिस्टिक्स कार्यक्षमता, निर्यात वित्तपुरवठा आणि औद्योगिक आत्मनिर्भरतेला पाठिंबा देतात, तेव्हा अधिशेष हा योगायोग न राहता प्रत्यक्षात येतो. चीन आपल्या व्यापाऱ्यांना अधिक खुल्या आणि सुलभ बाजाराचे आश्वासन देतो आहेच. मात्र, जेव्हा १.२ लाख कोटी डॉलरचा अधिशेष दिसतो, तेव्हा जागतिक व्यापारावर याचा काय परिणाम होईल, भविष्यात याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील का, असे प्रश्न उद्भवतात.

जागतिक व्यापारातील असमतोल, स्थानिक व्यापाऱ्यांवर उत्पादन करण्याचा वाढता दबाव आणि चिनी निर्यातदारांना मिळणारा स्पर्धात्मक फायदा, याबद्दल जागतिक व्यापार संस्थांना चिंता वाटणे स्वाभाविक आहे. चीनशी स्पर्धा करणे म्हणजे अनेकांना सायकलवर बसून बुलेट ट्रेनशी शर्यत लावण्यासारखे वाटते. अनेक देश चिनी आयातीबद्दल कुरकुरत असले तरीही मोठ्या प्रमाणात ऑर्डर देत राहतात; कारण चिनी वस्तू स्वस्त, मुबलक आणि वेळेवर मिळतात. चीन आता उच्च-तंत्रज्ञान पुरवठादार बनला आहे, आणि प्रगत अर्थव्यवस्थांच्याच पुरवठादारांचा थेट प्रतिस्पर्धीही ठरत आहे. अमेरिकेने चिनी वस्तूंच्या आयातीवर शुल्क लादले, जवळ-जवळ बंदीच घातली, आणि तरीसुद्धा चीनने ऐतिहासिक निर्यात आकडे नोंदवले. म्हणजेच, अमेरिका व्यापारयुद्ध जिंकलेली नाही. आणि चीनचे म्हणाल तर, या तथाकथित व्यापारयुद्धात चीनची अर्थव्यवस्था अपेक्षेपेक्षा किती तरी अधिक लवचीक ठरली आहे. पण वर म्हटल्याप्रमाणे, हे काही पूर्णपणे नवीन नाही. गेल्या दशकभरात चीन सतत आपल्या व्यापारजाळ्याचा समतोल साधत आहे. जमीन आणि समुद्र, दोन्ही बाजूंनी नव्या मार्गांमध्ये गुंतवणूक करून व्यापार वाढवणे हेच चीनचे मुख्य धोरण आहे. प्राचीन काळापासून, अगदी 'रेशीम मार्गाच्या' व्यापारापासून, चीनने हेच धोरण अवलंबिले आहे अधिकाधिक माल जास्तीत-जास्त देशांत विकणे. त्याचबरोबर चीन, पाश्चिमात्य ग्राहकांवरचे आपले अवलंबित्व कमी करण्याच्या प्रयत्नात आहे. चिनी कंपन्या आता केवळ तयार उत्पादने निर्यात करत नाहीत, तर आग्नेय-आशिया आणि लॅटिन-अमेरिकेतल्या देशांमधल्या कारखान्यांना विविध घटक पाठवत आहेत, ज्यांना एकत्रित करून ते उत्पादन, या देशांमधील द्विपक्षीय व्यापार करारांमुळे, अतिशय कमी किंवा शून्य शुल्कावर अमेरिकेत पाठवली जातात. म्हणजेच आजही अमेरिका चिनी वस्तूच खरेदी करतोय, फरक एवढाच की आता माल दुसऱ्या देशांच्या मध्यस्थीने येतोय!

# १४ फेब्रुवारी 'राष्ट्रीय मातृ-पितृ पूजन दिन' म्हणून साजरा व्हावा !

संस्कृतीप्रिय देश म्हणून जगात ओळख असलेल्या भारतातील तरुणांवर पाश्चात्य संस्कृतीचाच अधिक प्रभाव असल्याने व्हॅलेंटाईन डे सारखे भोगवादाला खतपाणी घालणारे दिवस इथे उत्साहाने साजरे होतात. तरुणपिढीला हानिकारक असल्याचे लक्षात आल्यावर अनेक देशांनी व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यावर बंदी घातली. आपल्या देशात मात्र तो वर्षागणिक अधिक फोफावतो आहे.

भारतीय संस्कृतीला अनुसरून १४ फेब्रुवारी हा 'मातृ-पितृ पूजन दिन' म्हणून साजरा करावा, अशी मागणी गेल्या काही वर्षांत संस्कृतीप्रेमी संघटना आणि नागरिकांकडून केली जात आहे; मात्र शासनाकडून त्यास कोणताही प्रतिसाद मिळताना दिसत नाही. शासन याबाबत पुढाकार घेण्यास तयार नसले तरी अनेक धार्मिक आणि सामाजिक संघटनांनी मागील काही वर्षांपासून १४ फेब्रुवारी हा दिवस मातृ पितृ पूजन दिन म्हणून साजरा करण्यास आणि त्याबाबत समाजामध्ये जागृती करण्यास सुरुवात केली आहे.

समाजातूनही या उपक्रमास भरघोस प्रतिसाद मिळत आहे. याबाबत शाळा आणि महाविद्यालयांम ध्येही जागृती केली जात आहे. विद्यार्थ्यांकडूनही याविषयी सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. भारतीय कुटुंबव्यवस्थेसारखी कुटुंबव्यवस्था जगात कुठेही नाही. आयुष्यभर कुटुंबाला एका धाग्यात बांधून ठेवण्याचे काम माता-पिता करत असतात. आपल्या इच्छा-आकांक्षा, आपले सुख बाजूला ठेवून अपत्याला जगातील सर्व सुख सुविधा मिळाव्यात यासाठी ते दिवसरात्र झटत असतात. त्यांचे ऋण फेडणे जरी शक्य नसले, तरी वर्षातून किमान एक दिवस त्यांचे मनोभावे पूजन करून त्यांच्या उपकाराप्रती कृतज्ञता व्यक्त करणे सहज शक्य आहे. १४ फेब्रुवारी या दिवशी मातृ-पितृ पूजन दिन साजरा केल्यास आपसूकच व्हॅलेंटाईन डेचे महत्व कमी होऊन तरुणवर्गामध्ये आई-वडिलांविषयी आदर वृद्धिंगत होण्यास साहाय्य होईल.

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

# मद्यधुंद अवस्थेत कारचालकाची धडक !

**दि.०७, नवी मुंबई :** नवी मुंबईत मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. करावे गाव परिसरात भरधाव वेगात असलेल्या इनोव्हा कारने रस्त्यावर उभी तसेच सुरू असलेली अनेक वाहने जोरदारपणे धडक दिली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी अनेक वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे अपघात करणाऱ्या कारवर 'पोलीस' अशी नेमप्लेट असून, वाहनातून वरिष्ठ पोलीस निरीक्षकाचे ओळखपत्र सापडल्याने प्रकरण अधिकच गंभीर बनलं आहे.

**भरधाव इनोव्हाची वाहनांना धडक**

घटना घडली त्यावेळी रस्त्यावर वर्दळ होती. अचानक भरधाव इनोव्हा कारने एका मागोमाग एक वाहनांना धडक दिल्याने परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झालं. अपघाताचा आवाज इतका भीषण होता की नागरिकांनी धाव घेत घटनास्थळी गर्दी केली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, कारचालक मद्यधुंद अवस्थेत असल्याचं स्पष्टपणे जाणवत होते. नशेत वाहन चालवल्यामुळेच चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि हा अपघात घडल्याचं सांगण्यात येत आहे. अपघातानंतर इनोव्हा कारची तपासणी केली असता, वाहनावर 'पोलीस' अशी नेमप्लेट असल्याचे आढळून आली. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम आणि संताप व्यक्त करण्यात आला. पुढील तपासात कारमधून मुंबई पोलिसांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण बबन पोखरकर यांचे ओळखपत्र सापडल्याची माहिती मिळत आहे. ही बाब समोर आल्यानंतर 'कायद्याचे रक्षकच कायदा मोडत आहेत का?' असा सवाल उपस्थित होत असून, प्रकरणाला वेगळे वळण मिळालं आहे.

# गाढे अभ्यासक

काय लागे निकाल
पहा धागधूक वाढे
हतबध्द झाले कसे
सारे अभ्यास गाढे

अपयश उभे समोर
दुर्मुखले का मुखडे
अपेक्षा भंग झाली
सांगू कुणास दुखडे

पुढे तरी जावे कसे
पाय ओढती खेकडे
जेत्यां दावे वाकुल्या
नाचती मनी माकडे

हरणार म्हणे ज्यांना
त्यांचीचं चारले खडे
चुका मारल्या माथी
सुनावती बोल खडे

लहान मानले ज्यास
कुशीत मस्त बागडे
मुख्यस्थानी कोणे रे
लागती आता झगडे

शक्य होते अशक्य
अनपेक्षित सर्व घडे
कळेना कसे असले
भाग्य कुणाचे उघडे

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

# मुंबई महानगरपालिकेने अखिल भारतीय आंतर महानगरपालिका क्रीडा स्पर्धा भराव्यात

मुंबई महानगरपालिका क्रीडा २६ एप्रिल २०२६ रोजी शताब्दी वर्षात पदार्पण करीत आहे.२६ एप्रिल १९२६ साली तत्कालीन महापालिका आयुक्तांनी म्युनिसिपल जिमखाना इमारत आझाद मैदान प्रवेश द्वार शेजारी ,म हानगरपालिका मुख्यालया समोर बांधून महापालिका कामगार - कर्मचाऱ्यांना खेळांची सुविधा निर्माण करून दिली.स्वतंत्र जिमखाना घटना तयार करून दर दोन वर्षांनी खेळाडूंमधुन कार्यकारिणी निवडण्याकरिता सार्वजनिक निवडणूक घेण्याची घटनेत तरतूद केली आहे.त्यानुसार क्रीडा भवनाचे प्रशासकीय कामकाज केले जाते.यंदाचे मुंबई महानगरपालिका क्रीडा भवनाचे १०० वे वर्ष २६ एप्रिल २०२६ रोजी सुरू होत आहे.क्रीडा भवनाचे दहा हजारांहून सर्वसाधारण सभासद आहेत ते मासिक वर्गणी भरतात.आणि अडीच हजारांहून अधिक आजीव सभासद आहेत.क्रीडा भवनाचे सभासद महानगरपालिकेचे कामगार - कर्मचारी आणि नगरसेवक आहेत.क्रीडा भवन कामगार आहेत त्यांना क्रीडा भवनाची निवास्थाने आहे.दरवर्षी क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.स्नेहसंमेलन घेऊन विविध खेळांच्या गुणवंत खेळाडूंना पारितोषिके देण्यात येतात.क्रीडा भवनाच्या असंख्य खेळाडूंनी राज्य पातळीवर, अखिल भारतीय पातळीवर, आंतरराष्ट्रीय पातळीवर सुवर्ण,रजत व कांस्य पदके जिंकली आहेत.क्रिकेट, कबड्डी, टेबल टेनिस, बॅडमिंटन, कॅरम, बुद्धीबळ,व्हॉलीबॉल, शुटींग बॉल,ॲथलेटीक्स, शरीरसौष्ठव,पॉवर लिफ्टींग,वेटलिफ्टींग , नेमबाजी, फुटबॉल इत्संयादी संघ आहेत या संघातील खेळाडूंनी मुंबई महानगरपालिकेचे नाव उज्ज्वल केले आहे.मुंबई महानगरपालिका भारतातील अग्रगण्य म हानगरपालिका आहे.आंतरराष्ट्रीय किर्तीचे शहर म्हणून मुंबईची ओळख आहे.मुंबई महानगरपालिका क्रीडा विश्वात आघाडीवर आहे.मुंबई महानगरपालिकेचे खेळाडू आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धात सहभागी होत असतात.अनेक पदके प्राप्त केलेली आहेत.मुंबईच्या तत्कालीन महापौर महोदयांनी यापूर्वी १९७८ साली मुंबईत अखिल भारतीय आंतर महानगरपालिका क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले होते.त्यानंतर आजतागायत क्रीडा स्पर्धा मुंबईत झालेल्या नाहीत.१९७८ साली घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धेत इनडोअर आणि आऊट डोअर खेळांचा समावेश होता. कॅरम, टेबल टेनिस, बॅडमिंटन, बुद्धीबळ, क्रिकेट, कबड्डी, व्हॉलीबॉल, आणि ॲथलेटीक्स खेळांचा समावेश होता. अखिल भारतीय आंतर महानगरपालिका क्रीडा स्पर्धा आयोजित केलेल्या महानगरपालिका पुढीलप्रमाणे आहेत - १९७७- दिल्ली,१९७८ -मुंबई,१९८०- कलकत्ता,१९८० - अहमदाबाद,१९८१- बडोदा,१९८१-बेंगलोर,१९८३-कोल्हापूर,१९८३-हैद्राबाद,१९८४- सोलापूर,१९८५-भावनगर,१९८७- नासिक,१९९९ - चेन्नई . मुंबई महानगरपालिका क्रीडा भवनाचे स्वतःचे बॅडमिंटन कोर्ट, टेबल टेनिस कोर्ट आहेत.कॅरम रूम आहे.क्रिकेट खेळाचे मैदान आहे.मुंबईच्या महापौरांना विनंती आहे की, मुंबई म हानगरपालिका क्रीडा भवन शताब्दी वर्षात अखिल भारतीय आंतर महानगरपालिका क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे.जेणे करून अखिल भारतीय महानगरपालिकांचे खेळांचे संघ क्रीडा भवनाच्या शताब्दी वर्षाच्या क्रीडा म होत्सवात सहभागी होतील.

**- महादेव गोळवसकर, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# अहिल्यानगर-पुणे रेल्वे डबल लाईनचा डीपीआर पूर्ण

## प्रकल्पाला तातडीने मंजुरी मिळावी; केंद्राकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** नगर जिल्ह्याच्या दीर्घकालीन विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या अहिल्यानगर-पुणे नवीन दुहेरी (डबल लाईन) रेल्वेमार्गाचा डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट (डीपीआर) तयार झाला असून या प्रकल्पाला तातडीने मंजुरी मिळावी, यासाठी केंद्र सरकारकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू असल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली.

केंद्र सरकारच्या पीएम गतीशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनअंतर्गत पुणे-नाशिक रेल्वे कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासाठी विविध टप्प्यांवर काम सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून १३३ किलोमीटर लांबीचा अहिल्यानगर-पुणे नवीन डबल लाईन रेल्वेमार्ग प्रस्तावित असून, हा मार्ग अहिल्यानगर जिल्ह्यातील भागातून जाणार आहे. या संदर्भात खासदार लंके म्हणाले की, हा प्रकल्प केवळ दोन शहरांमधील अंतर कमी करणारा नसून शेतकरी, विद्यार्थी, कामगार, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात थेट सकारात्मक बदल घडवणारा आहे. डीपीआर तयार होणे ही महत्त्वाची पायरी असून, आता मंजुरी व प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणे आवश्यक आहे. अहिल्यानगर परिसरात यापूर्वीच रेल्वे पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय प्रगती झाली आहे. पुणतांबा-निंबळक दुहेरीकरण पूर्ण, निंबळक-अहिल्यानगर दुहेरीकरण प्रगतीपथावर असून, साईनगर शिर्डी-पुणतांबा दुहेरीकरणाला मंजुरी मिळाल्याने अहिल्यानगर हा पुणे, नाशिक, शिर्डी आणि मराठवाडा मार्गांचा केंद्रबिंदू ठरत आहे.

# सायन पनवेल महामार्गावर सखोल स्वच्छता मोहीम



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रातील हवा गुणवत्ता सुधारणेसाठी सातत्याने विविध उपाययोजना करण्यात येत असून विशेषत्वाने सायन पनवेल महामार्गावर नियमितपणे डिप क्लिनींग ड्राईव्ह राबविण्यात येत आहे. आज तुर्भे विभाग कार्यालय क्षेत्रांतर्गत सायन पनवेल महामार्ग तसेच सानपाडा तुर्भे दत्तमंदिर परिसर येथे सखोल स्वच्छता मोहीम राबवून वायू प्रदूषण टाळण्याच्या दृष्टीने धूळ, माती सफाई करून उचलून नेण्यात आली. नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार, अति आयुक्त सुनील पवार, उप आयुक्त सोमनाथ पोटरे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे, तुर्भे विभागाचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी सागर मोरे, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्यासह, स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांच्या नियंत्रणाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

त्यासोबतच विविध ठिकाणच्या स्वच्छता मोहीमांमध्ये लोकसहभागावर भर दिला जात असून नमुंमपा कोपरखैरणे विभाग कार्यालयामार्फत इस्कॉन एलेव्हेटर प्रा. लिमी. यांच्या सहभागातून संयुक्तपणे इलेक्ट्रिक झोन एमआयडीसी महापे येथे दुपारच्या कालावधीत सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये इस्कॉन कंपनीचे संचालक शामी कुनेल, उपाध्यक्ष लता नाम्बीयार व महादेव राऊत आणि कंपनीतील १०० हून अधिक कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला. या मोहिमेमध्ये कोपरखैरणे विभागातील स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व कर्मचारी यांनी एकत्रितपणे १५० किलोहून अधिक कचरा जमा केला. अशाच प्रकारची सखोल स्वच्छता मोहीम दिघा विभाग कार्यक्षेत्रातील कन्हैया नगर ते इलठण पाडा कच्च्या रस्त्यापर्यंत राबविण्यात आली. वाशी विभाग कार्यक्षेत्रातील वाणिज्य क्षेत्र, सेक्टर ३०ए, वाशी येथेही सखोल सफाई मोहीम घेण्यात आली.

# चिचोलीत 'युवा शासन ग्रुप'तर्फे माता रमाई जयंती उत्साहात साजरी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** चिचोली(खापरखेडा) वॉर्ड क्र.१ मध्ये 'युवा शासन ग्रुप' च्या वतीने त्यागमुर्ती माता रमाई आंबेडकर यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित भीमगीतांच्या कार्यक्रमाने उपस्थित जनसमुदायाला मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध, माता रमाई आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी महामानवांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.या सोहळ्याला प्रशासकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. याप्रसंगी पोलीस निरीक्षक हरीश रुमकर, भानेगाव ग्रामपंचायतच्या सरपंच शालिनी चवरे, चिचोली ग्राम पंचायतच्या सरपंच मीनाक्षी तागडे, ग्रामपंचायत सदस्य हेमलता पानतावणे, कविता मेश्राम, माजी सभापती चंद्रशेखर पानतावणे, अभियंता विलास उके, सचिन लीडर, गणेश चौरे, पवन सोमकुवर, गाढवे, पत्रकार केशव पानतावणे, धीरज बोरकर, धर्मेंद्र पानतावणे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवा शासन ग्रुपच्या कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले यामध्ये सम्यक पौनिकर, तुषार सोनवणे, संगम गजभिये, अभिषेक पाटील, लकी पानतावणे, मयूर पाटील, योगेश चौरे, सुगत पानतावणे, प्रज्वल पाटील, यश वासनिक, मयूर मेश्राम, हिमांशू खोब्रागडे, कार्तिक भौतकर, विशाल भंडारी, डगस तेडे, आदित्य डोंगरे, आदर्श डोंगरे, सुशील रांगडहाले, प्रदीप बोरसरे, श्रीकांत गजभिये यांसह ग्रुपच्या असंख्य कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग होता. कार्यक्रमाला चिचोली व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भीमगीतांच्या माध्यमातून माता रमाईंच्या त्यागाला आणि बाबासाहेबांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले.

# पारनेर तहसीलसमोर शेतकऱ्यांचे आंदोलन

## कांद्याला हमीभाव द्या; मातीमोल भावामुळे नुकसान




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** बाजार समित्यांमध्ये मातिमोल बाजारभावाने कांद्याची विक्री होत असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च भागत नाही. त्यासाठी सरकारने हस्तक्षेप करत कांद्याला रास्त हमीभाव देऊन नाफेड द्वारे खरेदी करावी, या मागणीसाठी अखिल भारतीय किसान सभा व भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे पारनेर तहसील कार्यालयासमोर धरणे धरत नायब तहसीलदार दीपक कारखिले यांना निवेदन दिले. यावेळी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष बबन सालके, संजय भगत, राजेंद्र गायकवाड, सुरेश होले, हरिभाऊ गायकवाड, दीपक इंगळे, सुशांत शिंदे, अंकुश गायकवाड, अमोल ठुबे, भागवत गायकवाड, सुनील झंजाड, संदीप गायकवाड, चंद्रकांत चौधरी, अशोक गायकवाड, साहेबराव खरमाळे, अजित गायकवाड, रंगनाथ शिंदे, दत्तात्रय झगडे, शिवाजी गायकवाड, सुलाबाई आदमाने यांच्यासह शेतकरी उपस्थित होते. यावेळी भाकपचे तालुका सचिव कॉ.संतोष खोडदे म्हणाले की, कांद्याचा उत्पादनखर्च वाढत आहे. खतांच्या किमती वाढलेल्या आहेत. युरियाचा काळाबाजार होत आहे. शेतकऱ्यांना युरिया मिळत नाही. शेतमजुरीचे दर वाढलेले आहेत. लाल कांद्याची साठवणूक करता येत नसल्याने मिळेल त्या बाजारभावाने शेतकऱ्यांना हा कांदा विकणे भाग पडत आहे. बाजार समितीतील दलाल व व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट होत आहे.

रात्री अपरात्री आणि पाणी भरून पिकविलेला कांदा आज हजार - अकराशे रुपये क्विंटलने विकावा लागत आहे. यात शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही भागत नाही. अशावेळी सरकारने हस्तक्षेप करत कांद्याला हमीभाव जाहीर करून रास्त भावाने नाफेडद्वारे कांद्याची खरेदी करावी. यापूर्वी कमी भावाने विकलेल्या कांद्याला अनुदान द्यावे. कांदा निर्यातीला प्रोत्साहन द्यावे. बाजार समितीने विक्रीसाठी आणलेल्या कांद्याचा वाहतूक खर्च, बारदाना, कडता व बाजार समितीच्या विविध करांमध्ये शेतकऱ्यांना सवलत द्यावी, अशा विविध मागण्या केल्या.

# मास्टरमाईंड गुजर पोलीस सेवेतून बडतर्फ; ड्रग्ज मुद्देमाल अपहार प्रकरणात मोठी कारवाई



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०८, अहिल्यानगर :** नगर येथील स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस कर्मचारी श्यामसुंदर गुजर हा ड्रग्ज तस्करी प्रकरणातील मास्टरमाईंड असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्याला शासन सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. श्रीरामपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जचा अपहार केल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून तो सध्या पोलिस कोठडीत आहे. याबाबतची माहिती पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

पुणे जिल्ह्यातील शिरूर पोलिसांनी १८ जानेवारी २०२६ रोजी केलेल्या संयुक्त कारवाईत शिरूर शहरातील डंबेनाला परिसरातून ड्रग्ज विक्रीसाठी आलेल्या शादाब रियाज शेख (वय ४१) याला ताब्यात घेतले होते. त्याच्याकडून एक किलो ५२ ग्रॅम ड्रग्ज जप्त करण्यात आले. चौकशीत आरोपी शेख याचा अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेतील कर्मचारी श्यामसुंदर गुजर याच्याशी संबंध असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पुणे ग्रामीण एलसीबी व शिरूर पोलिसांनी गुजर याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. तपासादरम्यान त्याने जप्त मुद्देमालातील ड्रग्ज चोरी करून विक्री केल्याचा संशय बळावल्याने २१ जानेवारी २०२६ रोजी त्याला अटक करण्यात आली. या गुन्ह्यात पारनेर व श्रीगोंदा तालुक्यातील दोघांनाही अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, गुजर याच्याकडे पोलिस मुख्यालयातील मुद्देमाल कक्षाची तोंडी जबाबदारी देण्यात आली होती. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १७ डिसेंबर २०२५ रोजी श्रीरामपूर येथे कारवाई करून जप्त केलेले अल्प्राझोलम हे ड्रग्ज पांढऱ्या गोणीत ठेवण्यात आले होते. चौकशीत गुजर याने त्या गोणीतील सुमारे १० किलो ९७५ ग्रॅम ड्रग्ज काढून त्याजागी मैदा भरल्याचे उघड झाले.

या ड्रग्जची बाजारमूल्य सुमारे १ कोटी ९ लाख ७५ हजार रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणाच्या चौकशीसाठी अपर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती.

समितीच्या अहवालात मुद्देमालाचा अपहार झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याच्या पार्श्वभूमीवर श्यामसुंदर गुजर याला पोलीस सेवेतून बडतर्फ करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

# आ. मुनगंटीवार यांचा चंद्रपूरच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस पुढाकार

## गायत्री शक्तिपीठ परिसरातील रस्ते, पार्किंग व सौंदर्यकरणासाठी निर्देश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** चंद्रपूर शहराचा सुसज्ज आणि सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी श्री वेदमाता गायत्री शक्तिपीठ, दाताळा परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. शक्तिपीठ परिसराचा सर्वांगीण विकास होऊन भाविकांना अधिक सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी त्यांनी संबंधित कामांना गती देण्याचे निर्देश म्हाडाच्या अधिकाऱ्यांना दिले.

या पाहणीदरम्यान रस्ते, पार्किंग, सौंदर्यकरण आणि परिसर विकासाच्या विविध विकासकामांबाबतही त्यांनी सूचना करत विकासाची ठोस दिशा निश्चित केली. दाताळा येथील श्री वेदमाता गायत्री शक्तिपीठाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे चौपदरीकरण, पार्किंग व्यवस्था, मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण तसेच गायत्री परिवाराच्या संकल्पनेनुसार बगीचा उभारण्याचे निर्देश त्यांनी नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे मुख्याधिकारी डॉ. विजय इंगोले यांना दिले. या कामांमुळे परिसराचा विकास होऊन भाविकांना अधिक सोयी उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या पाहणी दौऱ्यात नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे मुख्याधिकारी डॉ. विजय इंगोले, बांधकाम आणि म्हाडा विभागाचे अधिकारी, गायत्री परिवाराचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यावेळी म्हाडाच्या १७ हेक्टर खुल्या जागेत मुलांसाठी खेळण्याचे गार्डन, ऑक्सिजन पार्क, वृद्धांसाठी बसण्याची व्यवस्था तसेच अंतर्गत रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन आ. मुनगंटीवार यांनी दिले. चंद्रपूरचा सुसज्ज व आधुनिक विकास साधण्यासाठी आवश्यक निधी शासनस्तरावर उपलब्ध करून देण्याचे आश्वासन आ. मुनगंटीवार यांनी दिले. यावेळी गायत्री परिवाराच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे आभार मानत कृतज्ञता व्यक्त केली.

**✻पोलिस गृहनिर्माण व प्रशिक्षण केंद्रासाठी निधी✻**

पोलिसांसाठी गृहनिर्माण व प्रशिक्षण केंद्रासाठी आवश्यक निधी येत्या मार्चपर्यंत उपलब्ध करून देण्यासाठी पोलीस विभागाशी समन्वय साधून पाठपुरावा करण्याचेही आ.मुनगंटीवार यांनी नमूद केले.

**✻सर्वांजिक बांधकाम विभागाला सूचना✻**

नागपूर रोड ते देवाडा शिव हा ३० मीटर रुंदीचा व सुमारे ४.५ किलोमीटर लांबीचा रस्ता उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना आ.मुनगंटीवार यांनी दिल्या.

# पालम येथे गुरु रविदास जयंती उत्साहात साजरी




**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०८, पालम (परभणी) :** पालम शहरात चर्मकार समाज मंदिर येथे गुरु रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती रविवार, दिनांक ०८ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित विशेष व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून तुकाराम टोम्पे आणि मीनाक्षीताई वाघमारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना तुकाराम टोम्पे म्हणाले की, गुरु रविदास महाराज यांनी समता आणि बंधुभावाचा संदेश दिला. त्यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत. त्यांनी गुरु रविदास महाराजांच्या जीवनप्रवासातील महत्त्वाचे टप्पे सांगून, त्यांच्या शिकवणीची आजच्या काळात असलेली गरज अधोरेखित केली. या दरम्यान प्रमुख वक्त्या मीनाक्षीताई वाघमारे यांनी गुरु रविदास महाराज आणि संत कक्कय्या महाराज यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. संत कक्कय्या महाराज यांच्या सामाजिक क्रांतीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, या संतांनी आपल्या कार्यातून समाजातील विषमतेविरुद्ध आवाज उठवला आणि कष्टकऱ्यांच्या जीवनाला प्रतिष्ठा मिळवून दिली. यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ चा आदर्श घेऊन महिलांनी महिलांचे अधिकार जाणून घेत आयुष्यात प्रगती करावी असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते संत शिरोमणी गुरु रविदास महाराज व संत कक्कय्या महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.यानंतर संविधानाच्या प्रस्तविकाचे वाचन करण्यात आले कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून तुकाराम टोम्पे, मीनाक्षी वाघमारे, तसेच धोंडिबा टोम्पे, संदीप कांबळे, विठ्ठल टोम्पे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालासाहेब फुलपगार यांनी केले, यादरम्यान संदीप कांबळे यांनी उपस्थितांसोबत मनमोकळा संवाद साधत आभार व्यक्त केले , कार्यक्रमचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. यावेळी शहरातील समाज बांधव, व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शंकर टोम्पे, दिलीप चव्हाण, निखिल फुलपगार, रोहित गायकवाड, परमेश्वर टोम्पे, संजय टोम्पे, सागर टोम्पे, वैभव फुलपगार, आकाश चव्हाण, विशाल नांदुरे, मोहन टोम्पे, दिपक चव्हाण, बबलू फुलपगार, सुनील कांबळे, शंकर वाघमारे, दिलीप टोम्पे, शिवाजी वाघमारे, रामेश्वर चांदणे, रामा गायकवाड, पप्पू हिवरे, राम टोम्पे गंगाधर गायकवाड, गणेश माने, केशव फुलपगार, वामनराव फुलपगार, गुणाजी गायकवाड, आदी स्थानिक समाजबांधवानी परिश्रम घेतले.

# १० व्या राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा संपन्न

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** नाईन ए साईड फुटबॉल असोसिएशन, महाराष्ट्रच्या वतीने आयोजित १० व्या राज्यस्तरीय फुटबॉल चॅम्पियनशिप २०२५-२६ चा थरार नुकताच चनकापूर मैदानावर पार पडला. १२ व १७ वर्षांखालील गटात झालेल्या या चुरशीच्या स्पर्धेत भंडारा आणि मुंबई जिल्ह्याच्या संघांनी विजेतेपदावर आपले नाव कोरले.

दिनांक ५ ते ७ फेब्रुवारी दरम्यान रंगलेल्या या स्पर्धेत राज्यातील २५ जिल्ह्यांतील संघांनी भाग घेतला होता. १२ वर्षीय वयोगटातील अंतिम सामन्यात भंडारा जिल्हा संघाने जालना संघाचा २-० ने पराभव करत सुवर्णपदक पटकावले तर जालना जिल्ह्याला द्वितीय, तर ठाणे जिल्ह्याला तृतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले.१७ वर्षीय वयोगटात अत्यंत अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात मुंबई जिल्हा संघाने नागपूरचा २-१ ने पराभव करत जेतेपद मिळवले ते नागपूर जिल्हा द्वितीय आणि ठाणे जिल्हा संघाला तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले.




## भंडारा आणि मुंबई जिल्हा संघाने मारली बाजी

या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे, चनकापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत महाराष्ट्र राष्ट्रीय फुटबॉल संघाची निवड केली जाणार आहे. निवड झालेले खेळाडू छत्तीसगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

शनिवार, दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण सोहळा पार पडला. यावेळी विजेत्यांना स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

> राज्यातील खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा, हाच या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे.
> **- खुशाल इंगोले (आयोजक)**

याप्रसंगी मंचावर सबएरिया सिल्लेवाडा राणू रंजन, मनोज त्रिपाठी, डॉ गुफरान सिद्दीकी, रवी वर्मा, आकाश निनावे, संदीपकुमार प्रसाद, उपसभापती राहुल तिवारी खापरखेडा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील जालंदर, सावनेर तालुका क्रीडा सचिव अशोक चव्हाण, विजय प्रसाद, संजय कुरील, धर्मेंद्र पासी, आस्तिक बागडे, नितीन उंबरे, दिलीप शर्मा, संतोष कश्यप, मनोहर तट्टे, विपीन शर्मा, प्रदीपकुमार प्रसाद, खुशाल इंगोले, अरविंद कश्यप, योगेश लोहकरे, मंगेश पौणिकर, शुभांगी इंगोले, आदि उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खुशाल इंगोले यांनी केले तर प्रदीपकुमार प्रसाद यांनी आभार मानले.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी असोसिएशनचे पदाधिकारी स्थानिक क्रीडाप्रेमी, सर्व जिल्ह्याचे प्रशिक्षक आणि खेळाडूंनी मोलाचे सहकार्य केले.

# थोडक्यात

## हद्दपार आरोपीला राहुरी पोलिसांकडून वांबोरीत ताब्यात; गंगापूर पोलिसांच्या स्वाधीन

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०८, राहुरी (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेल्या आरोपीला राहुरी पोलिसांनी वांबोरी परिसरातून ताब्यात घेत कारवाई केली. याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला पुढील कारवाईसाठी गंगापूर पोलीस स्टेशन, जि.छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



हद्दपार प्राधिकरण तथा पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांच्या आदेशान्वये आरोपी संदीप दिलीप चेडवाल व सोन्या उर्फ प्रसाद बाबासाहेब चेंडवाल (दोन्ही रा.गुंजाळे, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर) यांना दिनांक १८ डिसेंबर २०२५ पासून पुढील ६ महिन्यांसाठी संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा हद्दीतून हद्दपार करण्यात आले होते.

दरम्यान, सदर आरोपी वांबोरी हद्दीत येणार असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना मिळाल्यानंतर त्यांनी तत्काळ पोलीस पथकाला सूचना दिल्या. पथकाने वांबोरी परिसरात शोध घेतला असता दिनांक ०८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी आरोपी आढळून आला. त्याला ताब्यात घेऊन राहुरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १२८/२०२६ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पुढील कारवाईसाठी आरोपीला गंगापूर पोलीस स्टेशन, जि.छत्रपती संभाजीनगर येथे देण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस स्टेशनच्या पथकाने केली.

# महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर आ.जोरगेवारांच्या उपस्थितीत नियोजन बैठक संपन्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** आगामी महाशिवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर लालपेठ येथील महाराष्ट्रातील सर्वात मोठे व प्राचीन अशी ओळख असलेल्या महाशिवलिंग मंदिरात नियोजन बैठक उत्साहात पार पडली.

या बैठकीस आमदार किशोर जोरगेवार यांनी उपस्थित राहून महाशिवरात्री निमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांबाबत महत्त्वपूर्ण सूचना केल्या. यावेळी मनीष महाराज, महानगर पालिका अधिकारी, मंदिर कमिटीचे सदस्य आणि भक्तांची उपस्थिती होती. महाशिवरात्रीनिमित्त मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या हजारो भाविकांच्या सोयीसुविधांचा विचार करून स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था, पिण्याचे पाणी, वाहतूक नियोजन तसेच इतर मूलभूत सुविधा योग्य प्रकारे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सविस्तर आणि काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश या बैठकीत आ. जोरगेवार यांनी दिले.

भाविकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करण्यावर त्यांनी भर दिला. चंद्रपूर जिल्ह्यात महाशिवरात्रीसह विविध धार्मिक सण मोठ्या श्रद्धा आणि



उत्साहात साजरे केले जातात. त्यामध्ये महाशिवरात्रीचा सण विशेष महत्त्वाचा असून दरवर्षी या दिवशी मोठ्या संख्येने भाविक शिव मंदिरात दर्शनासाठी येतात.

ही परंपरा अधिक सुस्थितीत आणि भक्तिमय वातावरणात पार पाडण्यासाठी नियोजन बैठक महत्त्वाची ठरली. या नियोजन बैठकीस मंदिर समितीचे पदाधिकारी, संबंधित विभागांचे अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नागरिक तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दक्षिण मध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी ५८ टक्के मतदान

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०७, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यामध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी शनिवारी शांततेत ५८.३९ टक्के मतदान झाले. एकूण २ लाख २३ हजार ३६७ मतदारांपैकी एक लाख ३० हजार ४२६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मात्र या निवडणुकीत मतदारांमध्ये निरुत्साह दिसून आला. दक्षिण सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ६ गट व पंचायत समितीच्या बारा गणात सुरळीत मतदान झाले. गटात २८ तर गणात ५२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरुन आपले नशीब आजमावत आहेत. तालुक्यातील काही गट व गणातील मतदान केंद्रावर सकाळी संथ गतीने मतदान चालू होते. दुपारपर्यंत केवळ १८ ते २४ टक्के इतकेच मतदान झाले होते. दुपारनंतर हळूहळू मतदान वाढले. साडेतीन वाजता ४३ टक्के मतदान झाले होते. दिवसभरात मंद्रूप, कंदलगाव, भंडारकवठे, हत्तुर, होटगी, आहेरवाडी, कुंभारी, बोरामणी, कासेगाव व वळसंग येथील केंद्रावर चुरशीने मतदान सुरू होते.

**मतदारांची धावपळ आणि निराशा**

मतदार याद्यांमधील आपली नावे मतदारांना सापडत नव्हते. यामुळे मतदार या बूथ वरून त्या बुथवर मतदार यादीत आपली नावे शोधण्यासाठी फिरताना दिसून आली. एका बूथवर पतीचे तर दुसऱ्या बूथवर पत्नीचे नाव असाही प्रकार दिसून आला. मतदार यादीमध्ये आपली नावे सापडत नसल्याने अनेक जणांनी मतदानाकडे पाठ फिरवली. ऑनलाइन यादी मधील मतदारांचा अनुक्रमांक व बूथ क्रमांक आणि ऑफलाइन दिलेली मतदान यादी मधील अनुक्रमांक व बुथ क्रमांक जुळत नव्हते नव्हते. यामुळेही मतदारांना वेगवेगळ्या बूथवर आपले नाव शोधण्यासाठी चकरा माराव्या लागत होत्या.

होटगी येथील केंद्रावर मतदान अधिकाऱ्यांना मतदारांना वारंवार मतदान पूर्ण होण्यासाठी मार्गदर्शन करावे लागत होते. अशा प्रकारातूनच शासकीय माध्यमिक आश्रम शाळेच्या मतदान केंद्रावर मतदार आणि अधिकारी यांच्यात वाद निर्माण झाला होता. मुळेगावतांडा येथील मतदान केंद्रावरील ईव्हीएम मशीनखाली चक्क टाचण्या टोचलेले लिंबू आणि मिरची ठेवून जादूटोणा केल्याचा खळबळजनक आरोप अपक्ष उमेदवार संदीप राठोड यांनी केला. या धक्कादायक प्रकारामुळे मतदारांमध्ये भीतीचं व गोंधळाचे वातावरण होतं. येथे एक महिला मतदार मतदान करण्यासाठी केंद्रात गेली. मतदान करून बाहेर येत असतानाच अचानक चक्कर येवून खाली कोसळली. शुद्धीवर आल्यानंतर त्या महिलेने ईव्हीएम मशीनच्या खाली लिंबू-मिरची आणि जादूटोण्याचे साहित्य पाहिल्याचे सांगितले. सर्वच मतदान केंद्रावर मंद्रूप वळसंग व तालुका पोलीस ठाण्याचे अधिकारी व पोलिसांचा मोठा बंदोबस्त होता. त्यामुळे कुठेही अनुचित प्रकार घडला नाही.

# वडाखालच्या शाळेतील आदिवासी मुलांची थेट 'काळाघोडा' आर्ट फेस्टिव्हला भेट

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०८, मुंबई :** कर्जत येथील ग्रुप ग्रामपंचायत पोशिर हद्दीतील वारे-चिंचवाडी येथील ठाकर आदिवासी वाडीत सुरू असलेल्या 'वडाखालच्या शाळे'च्या विद्यार्थ्यांना पुस्तकांपलीकडचे जग अनुभवता यावे, त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळावी आणि आत्मविश्वास बळकट व्हावा, या उद्देशाने मुंबईत भरवण्यात आलेल्या 'कला घोडा आर्ट फेस्टिव्हल २०२६'ला नेण्यात आले. या चार दिवसांच्या शैक्षणिक सहलीमुळे आदिवासी भागातील मुलांसाठी शिकण्याचे नवे दालन खुले झाले.

या काळाघोडा महोत्सवात सहभागी झालेल्या वडाखालच्या शाळेतील विद्यार्थ्यांना पहिल्यांदाच विविध प्रकारच्या कलांचे प्रत्यक्ष दर्शन घडले. रंगीबेरंगी चित्रप्रदर्शने, जिवंत शिल्पकला, रस्त्यावरील नाट्यप्रयोग, लोकनृत्य, संगीत मैफिली आणि सहभागी कार्यशाळांमधून मुलांना आपले विचार मोकळेपणाने व्यक्त करण्याची संधी मिळाली.

ग्रामीण व आदिवासी भागातील मुलांसाठी असा महोत्सव अत्यंत महत्वाचा ठरतो. विविध संस्कृती, वेगवेगळ्या विचारधारा आणि अभिव्यक्तीचे प्रकार जवळून पाहिल्यामुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना



मिळाली. आपणही काहीतरी वेगळं करू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्या मनात रुजला. अनेक मुलांनी पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर कला आणि संस्कृतीचा अनुभव घेतल्याने त्यांच्यात कुतूहल, उत्सुकता आणि शिकण्याची ओढ वाढल्याचे दिसून आले.

या निमित्ताने वडाखालच्या शाळेतील मुलांना चार दिवस छोट्या गटांमध्ये मुंबईला नेण्यात आले. या प्रवासात केवळ कला महोत्सवच नव्हे, तर महानगरातील जीवनशैलीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी ही त्यांना मिळाली. अनेक मुलांनी पहिल्यांदाच समुद्र पाहिला, स्वतः तिकीट काढून मेट्रोतून प्रवास केला, डबल डेकर बेस्ट बसमध्ये बसले.

कला ही केवळ पाहण्याची गोष्ट नसून, ती अनुभवण्याची, प्रश्न विचारण्याची आणि स्वतःला शोधण्याची प्रक्रिया आहे, हे या मुलांना प्रत्यक्ष अनुभवातून उमगले. यासोबतच भारतीय रिझर्व्ह बँकेला आतून भेट देत देशाची आर्थिक व्यवस्था समजून घेतली. दूरून का होईना मंत्रालय, विधान भवन आणि महानगरपालिका पाहून प्रशासनाची रचना आणि कामकाजाची माहिती मिळाली.

दरम्यान आदिवासी मुलांची ही सहल केवळ मनोरंजनापुरती मर्यादित न राहता, मुलांचा आत्मविश्वास वाढवणारी, शहर, व्यवस्था आणि व्यापक जग समजून घेण्याची शिकवण देणारी ठरली, वेगाने धावणाऱ्या शहरांमध्ये हरवत चाललेली मानवी मूल्ये आदिवासी समाजात तरी टिकून राहावीत आणि त्याचबरोबर या मुलांनाही बदलत्या जगाशी संवाद साधता यावा, या उद्देशाने वडाखालची शाळा अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करत आहे, कला घोडा' आर्ट फेस्टिव्हलमधील हा अनुभव शिक्षण म्हणजे केवळ अभ्यासक्रम नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभवातून जीवन समजून घेण्याची प्रक्रिया आहे. हे ठळकपणे अधोरेखित करणारा ठरला आहे.

## वडाचे म्हसवे यात्रेत पाळण्यात केस अडकून महिला पोलीस कर्मचारी गंभीर जखमी

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०८, जावली - मेढा (सातारा) :** वडाचे म्हसवे येथील वार्षिक यात्रेदरम्यान पाळण्यात बसताना घडलेल्या गंभीर अपघातात पुणे येथे कार्यरत असलेल्या महिला पोलीस कर्मचारी ऋतुजा सावंत या गंभीर जखमी झाल्या आहेत. पाळण्यात बसल्यानंतर काही क्षणातच त्यांचे केस पाळण्याच्या यंत्रणेत अडकल्याने हा दुर्घटनाग्रस्त प्रसंग घडला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, पाळणा पूर्ण वेगात असतानाच ऋतुजा सावंत यांचे केस अडकल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ मदतीसाठी आरडाओरडा केला. मात्र पाळण्याचा वेग अत्यंत जास्त असल्याने काही क्षणांतच त्यांच्या डोक्यावरील केस मुळासकट ओढले गेले, त्यामुळे त्या गंभीर जखमी झाल्या.यावेळी प्रसंगावधान राखत काही ग्रामस्थ व युवकांनी जीव धोक्यात घालून पाळण्याला लोंबकळत तो थांबवण्याचा प्रयत्न केला. अखेर पाळणा थांबवण्यात यश आले. तोपर्यंत ऋतुजा सावंत यांच्या डोक्याला गंभीर जखम झाली होती. तात्काळ त्यांचे अडकलेले केस कापून त्यांना उपचारासाठी सातारा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.डोक्यावरील जखम गंभीर असल्याने पुढील शस्त्रक्रिया व उपचारासाठी त्यांना पुणे येथे हलविण्यात आले असून उपचारासाठी मोठा खर्च अपेक्षित असल्याची माहिती मिळत आहे.या घटनेमुळे वडाचे म्हसवे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यात्रेत उभारण्यात येणाऱ्या अशा धोकादायक व नादुरुस्त पाळण्यांबाबत कोणतीही सुरक्षितता मानके पाळली जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. भविष्यात यात्रांमध्ये अशा पाळण्यांवर कडक निर्बंध घालावेत तसेच परवानगी,सुरक्षा नियमांची सक्तीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## विंचूर येथे अंगणवाडीत 'अन्नप्राशन' सोहळा साजरा; ६ महिने पूर्ण झालेल्या बालकांना दिला पूरक आहार

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०८, विंचूर (नाशिक) :** एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) योजनेअंतर्गत, विंचूर येथील राजवाडा अंगणवाडी केंद्र क्रमांक ६०८ मध्ये 'सामुदायिक आधारित कार्यक्रम' (CBE) अंतर्गत दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी अन्नप्राशन सोहळा उत्साहात संपन्न झाला. बाल विकास प्रकल्प अधिकारी आरती पाटील व पर्यवेक्षिका वंदना खांदवे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विंचूरचे सरपंच सचिन दरेकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार सुनील क्षिरसागर उपस्थित होते. सकस आहारातून सुदृढ पिढीचा संकल्प ६ महिने पूर्ण झालेल्या बाळाला आईच्या दुधासोबतच बाह्य पूरक




आहाराची अत्यंत गरज असते. याविषयी मार्गदर्शन करताना सांगण्यात आले की, बाळाला आता वरण-भात, खिचडी, विविध भाज्यांचे सूप, फळांचा रस आणि नाचणीची पेज यांसारखा मऊ व सैलसर आहार सुरू करणे आवश्यक आहे. हा आहार देताना स्वच्छतेची काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. आईने बाळाचा आहार शिजवण्यापूर्वी आणि भरवण्यापूर्वी हात स्वच्छ धुवावेत, जेणेकरून बाळाला जंतूसंसर्ग होणार नाही आणि त्याची शारीरिक व मानसिक वाढ उत्तम होईल.या बालकांचे झाले. अन्नप्राशन कार्यक्रमात राधिका जोशी व शितल पवार यांच्या बालकांना मान्यवरांच्या हस्ते अन्नप्राशन करून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी अंगणवाडी सेविका मनीषा जंगम, वैशाली चव्हाण, स्मिता काळे, शिवकन्या जंगम, सोनाली शिरसाठ, सुवर्णा दरेकर, रूपाली साळुंके यांनी नियोजनात सहभाग घेतला. याप्रसंगी परिसरातील लाभार्थी महिला, गरोदर माता, किशोरी मुली आणि संजीवनी बागले यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अंगणवाडीच्या या उपक्रमाचे पालकांनी विशेष कौतुक केले आहे.

## डिजिटल बस पाससाठी ठाणे सॅटीस पुलावर ज्येष्ठ नागरिकांची गर्दी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०८, ठाणे :** ठाणे परिवहन उपक्रमाच्या टीएमटी गाड्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास दिला जातो. परंतु, या योजनेतील गैरप्रकार टाळण्यासाठी आता 'डिजिटल बस पास' योजना राबवण्यात येत आहे. केवळ ठाणे महापालिका क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांनाच या सुविधेचा लाभ मिळावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाल्याने टीएमटी आगारातील कार्यालयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. ज्येष्ठ नागरिकांना एक ते दोन तास रांगेत उभे राहावे लागत असल्यामुळे त्यांच्यामधून संताप व्यक्त केला जात आहे.